॥ श्री ॥
॥ बाबा ॥

# अंगाईगीत

निज माझ्या गोंडस बाळा
वांगणेश्वरा चित्तचोरा
तुझ्या चिंतनात राहो
तन-मन-चित्त यांसी ॥धृ.॥

अद्वैतातून जागे केले, भूपाळी म्हणोनी
स्नान, पोषाख झाला थाट, विविध उपचार
तुला निजवावे व्हावे, तल्लिन आत्मरंगी ॥1॥

आत्मज्योती निर्गुणरूपे, प्रखर तिचे तेज
जाणीव ती आहे पण, काजळीचे वेष्टन त्यावर
एक क्षण स्वस्थ बैसूनी, द्यावा वाव चैतन्यासी ॥2॥

सगुणातूनी निर्गुणध्यान, आहे असा मार्ग
तुझ्यारूपे मार्गदर्शन, तूच तुझा उद्धारक
व्हावे स्वयंप्रकाशित, निजवूनी तू स्वतःसी ॥3॥

★★★★★